# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

URGENT

आरोग्य विभाग

क्रमांक : चंशमनपा/आवि/कोरोना विषाणु/९६३/२०२० दिनांक : १३/०८/२०२०

**आदेश :-**

वाचा :- **१. महाराष्ट्र कोवीड-१९ उपाययोजना नियम २०२०, दिनांक :१४.०३.२०२०**

**२. या कार्यालयाचे आदेश क्र.चंशमनपा/आरोग्य विभाग/७२२/२०२०**
**दिनांक : ३१.०७.२०२०**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुचा (कोव्हीड-१९) प्रार्दुभाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदी नुसार अधिसूचना निर्गमित कलेली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुने (कोव्हीड-१९) उदभ्वणा-या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी महाराष्ट्र कोव्हीड-१९, उपाययोजना नियम २०२० यातील नियम ३ नुसार शहरी भागात आयुक्त, महानगरपालिका, चंद्रपुर यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे व त्यांना कार्यक्षेत्रातील कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या करण्यासाठी ते सक्षम असतील, असे जाहीर केले आहे.

ज्याअर्थी, उक्तप्रमाणे नियम १० अन्वये, आयुक्त, महानगरपालिका यांना (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता आवश्यक उपाययोजना करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

ज्याअर्थी, चंद्रपुर महानगरपालिका, चंद्रपुर हद्दीतील, **गजेन्द्र प्लाजा, अपेक्षा नगर, वडगांव प्रभाग क्र. ८** या भागात कोरोना बाधित रुग्ण आढळल्याने व त्याचा प्रादुर्भाव शहरातील इतर भागात पसरु नये याकरिता सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने तसेच शहरातील नागरिकांचे हीत व सुरक्षेस्तव सदर क्षेत्र प्रतिबंधित क्षेत्र म्हणून संदर्भ क्र. २ अन्वये या कार्यालयाव्दारे घोषित करण्यात आले होते.

ज्याअर्थी, खालील नमुद घोषित प्रतिबंधित क्षेत्रात कोवीड-१९ पॉजिटिव्ह असे नव्याने कोणतेही रुग्ण आढळून न आल्याने आता हे घोषित केलेले प्रतिबंधित क्षेत्र मुक्त करुन प्रतिबंधित क्षेत्राबाबतचे आदेश रद्द करणेस हरकत नाही, अशी माझी खात्री झाली आहे.

| अ.क्र. | प्रतिबंधित क्षेत्राचे नाव | झोन क्र. | प्रभाग क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | गजेन्द्र प्लाजा, अपेक्षा नगर, वडगांव प्रभाग क्र. ८ | मनपा झोन क्रमांक १ | प्रभाग क्र. ८ |

Scanned with CamScanner

त्याअर्थी, उक्तप्रमाणे नमूद संबंधित क्षेत्र, हे या आदेशाव्दारे मुक्त करण्यात येऊन उक्त क्षेत्रासंदर्भातील प्रतिबंधित करण्याबाबतचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

मा. पोलिस अधिक्षक, चंद्रपुर शहर व संबंधित झोनचे मनपा सहाय्यक आयुक्त यांनी यासंबंधाने याची नोंद घेऊन आवश्यक अनुषंगीक कार्यवाही करावी.

(राजेश मोहिते)
**आयुक्त,**
**चंद्रपुर शहर महानगरपालिका,**
**चंद्रपुर**

**प्रतिलीपी माहितीस्तव :-**

- मा. विभागीय आयुक्त, नागपुर विभाग, नागपुर यांना माहितीस्तव सविनय सादर.
- मा. जिल्हाधिकारी, चंद्रपुर जिल्हा, चंद्रपुर.
- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपुर.

**प्रतिलीपी आवश्यक कार्यवाहीस :-**

- मा. पोलिस अधिक्षक, चंद्रपुर शहर, चंद्रपुर
- कामगार आयुक्त, चंद्रपुर
- सहा. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, चंद्रपुर
- सहा. आयुक्त, झोन क्र. १, मनपा चंद्रपुर
- इंसिडेन्ट कमांडर (कोवीड-१९) तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, चंद्रपुर.
- अन्नधान्य वितरण अधिकारी, चंद्रपुर शहर, चंद्रपुर
- वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, चंद्रपुर

Scanned with CamScanner